# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


ई-मेलद्वारे

क्रमांक :-विकाअ/शिक्षण/कार्यशाळा/२०१६/2112

दिनांक 2 6 MAY 2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशात्र, पदवी व पदविका संस्था
तसेच विद्यापिठ व्यवस्थापनांतर्गत असलेल्या सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय:- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता व नियमांबाबत कार्यशाळा आयोजित करण्याबाबत.**
**संदर्भ :-** मा. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/Workshop/२०१६/६६१ दि. २४/५/२०१६.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाने व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता व नियमांबाबत प्रवेशोत्सुक विद्यार्थी व पालक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याबाबत कळविले आहे. प्रवेश नियमांची माहिती असलेल्या दोन शिक्षकीय अधिकारी व Supporting Technical Staff उदा. Programmer यांची नेमणुक करुन अशा प्रकारच्या तीन ते चार कार्यशाळा जिल्हा / तालुका स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. ज्यामुळे प्रवेश प्रक्रियेची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. जिल्हा / तालुका स्तरावर अशाप्रकारे कार्यशाळा दिनांक १०/०६/२०१६ पुर्वी आपल्या संस्थेमार्फत आयोजीत करावयाची असल्याने सदर कार्यशाळा आयोजित करण्याचा दिनांक व ठिकाण दिनांक ३०/०५/२०१६ पुर्वी पत्राव्दारे कळवावे. जेणे करुन या कार्यालयास आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल, याची नोंद घ्यावी. तसेच संदर्भीय पत्राची प्रत आपल्या माहितीकरीता यासोबत जोडण्यात येत आहे.

**सहपत्र :-** संदर्भीय पत्राची प्रत.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2a@dte.org.in Internet :http//:www.dtemaharashtra.gov.in


क्र.2अ/एडीएम/Workshop/2016/ ६६१

दिनांक : 24 MAY 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

**विषय** : व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता व नियमांबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत

**संदर्भ** : संचालनालयाचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2016/कार्यशाळा/505 दिनांक 25.04.2016

शैक्षणिक वर्ष 2016-17 मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या शिक्षण संस्थासाठी प्रवेश पात्रता व नियमांबाबत कार्यशाळा आपल्या विभागांतर्गत आयोजित करण्यात आल्या होत्या. नवीन नियमांबाबत सविस्तर माहिती देणे व त्यांचे समुपदेशन करणे याबाबत कार्यशाळा आयोजित करणेबाबत कळविण्यात आलेले होते. आपल्या सर्वांच्या सहकार्याने व योग्य रीतीने केलेले नियोजन यामुळे सर्व संसथांच्या प्राचार्य व अधिका-यांसाठीच्या कार्यशाळा त्यांच्या उत्स्फुर्त सहभागासह संपन्न झालेल्या आहेत. त्यानंतर प्रवेशोच्छुक विद्यार्थी व पालक यांच्यासाठी कार्यशाळा घेणे आवश्यक आहे.

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत जिल्हा/तालुका स्तरावर अशा प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात. प्रवेश नियमांची माहिती असलेल्या दोन शिक्षकीय अधिकारी व Suporting Technical Staff उदा. Programmer यांची नेमणुक करुन अशाप्रकारच्या तीन ते चार कार्यशाळा जिल्हा/तालुका स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजन करताना तेथील स्थानिक संस्थाना सुद्धा त्यामध्ये सामील करुन घ्यावे ज्यामुळे प्रवेश प्रक्रियेची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पाहोचण्यास मदत होईल.

आपल्या विभागातील जिल्हा/तालुका स्तरावर अशाप्रकारे कार्यशाळा दिनांक 10.06.2016 पूर्वी आयोजनाची उचित कार्यवाही आपल्यामार्फत करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

E:\modak\2016-17\Workshop Letter.docx